ऐक्य
९२ वर्षांची वाचनीय परंपरा
e : www.dainikaikya.com सातारा शनिवार दि. ३०/७/२०१६ email : news@dainikai

# कॉलेज बाहेरील विद्यार्थ्यांवर कठोर कारवाईची कोरेगाव विकास मंचची मागणी

▲ सातारा, दि. २९ : कोरेगाव येथील उच्च शैक्षणिक दर्जा असलेल्या डी. पी. भोसले कॉलेजमधील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न कॉलेज बाहेरील विद्यार्थ्यांकडून होत आहे. संबंधितांवर कठोर कारवाई करावी. प्रसंगी पोलिसांची मदत घ्यावी, अशी मागणी कोरेगाव विकास मंचचे अध्यक्ष किशोर बर्गे यांनी प्राचार्य विजयसिंह सावंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



विजयसिंह सावंत यांना निवेदन देताना किशोर बर्गे, समवेत दिलीप बर्गे, रामचंद्र बोतालजी व अन्य.

शैक्षणिक गुणवत्ता कायम राखण्यात डी. पी. भोसले कॉलेज नेहमीच अग्रेसर आहे. कॉलेजचा दर्जा चांगला राहील, असे आजपर्यंतच्या सर्व प्राचार्यांचे धोरण राहिले आहे. आपणही कॉलेजचे वातावरण चांगलेच राखले आहे. मात्र, हे वातावरण दूषित करण्याचा कॉलेज बाहेरची काही दुष्ट प्रवृत्तीची मुले करत आहेत. संबंधितांवर आपण कठोर कारवाई करावी. गरज भासल्यास पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी. कॉलेजचे अंतर्गत वातावरण शिक्षणासाठी पोषक राहील, याची दक्षता घ्यावी. विद्यार्थी मोबाईल व इंटरनेटच्या आहारी गेले आहेत. त्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी कॉलेजच्यावतीने संस्कार वर्गाचे आयोजन केले जावे. कॉलेजच्या वेळेत विद्यार्थ्यांना मोबाईल वापरास बंदी करावी. यासाठी कॉलेज प्रशासनाला कोरेगाव शहर विकास मंचचे सहकार्य राहील, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर किशोर बर्गे यांच्यासह दिलीप बर्गे, अरुण बर्गे, रामचंद्र बोतालजी, संतोष बर्गे, गोविंद कांबळे, ज्ञानेश्वर राऊत, महेश बर्गे, विठ्ठल काटे, अनिल बर्गे, अनिल पवार, राजेंद्र बर्गे, अधिक जाधव, विनोद गोरे, बाळासाहेब बागवान यांच्या सह्या आहेत.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

लोकमत सातारा, गुरुवार, दि. ४ ऑगस्ट २०१६ ३

## कॉलेज परिसरातील गुंडागर्दी थांबविण्याची मागणी

सातारा : कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेज आवारातील वातावरणास दूषित करण्याचा कॉलेज बाहेरचे काही दुष्टप्रवृत्तीची मुले करीत आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी कोरेगाव विकास मंचने केली आहे. गरज भासल्यास पोलिस प्रशासनास मदत मागावी; परंतु कॉलेजचे अंतर्गत वातावरण फक्त शिक्षणासाठीच पोषक राहील, याची दक्षता घ्यावी.

विद्यार्थ्यांचा जास्त वेळ अभ्यासात व उजळणीत न जाता मोठ्या प्रमाणावर वेळ प्रसारमाध्यमांवर जात असतो. आज काल मोबाईलच्या नवनवीन माध्यमांतून तरुण पिढीचा वेळ मोबाइलमध्ये कसा जाईल, याकडे इंटरनेटच्या माध्यमातून सुप्तरीतीने प्रयत्न होत आहेत. कोरेगाव विकास मंचचे अध्यक्ष किशोर बर्गे व इतर कार्यकर्त्यांच्यावतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.